

# समाजस्वास्थ्य


संपादक

र. धों. कर्वे, एम. ए.



वर्ष २६, अंक २ रा | १५ आगष्ट १९५२ | किंमत ४ आणे




# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | विवाह आणि प्रजोत्पत्ति-३ ... ... | २५ |
| २. | संपादकीय ... ... ... ... ... | ३० |
| ३. | ग्रंथपरीक्षण ... ... ... ... | ३२ |
| ४. | पत्रव्यवहार ... ... ... ... | ३४ |
| ५. | शारदेचें पत्र ... ... ... ... | ३९ |



## अेजंटांचीं नांवें

**मुंबई** : श्री. बागवे, न्यूज एजंट, खटाववाडी, गिरगांव.

**पुणें** : अेल्. के. जोशी, बुकसेलर.
डी. अेच्. शहा, बुकसेलर.

**अहमदनगर** : पी. जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ

**निपाणी** : के. एस्. बळगुर्गी

**कुमठा** : आर्. एम्. कामत

**गोकाक** : पी. एम्. शिरगांवकर

अेका सदभिरुचिसंपन्न, कुलीन, निरोगी, अव्यंग, देखण्या, उंच, ब्रह्मचारी, तिशीच्या तरुणाला केवळ अेकाच सम्मीलनार्थ शक्य तर वरील गुणांना जुळणाऱ्या कुमारिका तरुणीशीं पत्रव्यवहार-परिचय हवा. पत्रव्यवहार गुप्त. स्वतः कुमारिकांनी लिहावें. Q c/o **समाजस्वास्थ्य मासिक**, १३ भटवाडी क्रॉस लेन, मुंबई-४.

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# विवाह आणि प्रजोत्पत्ति–३

विवाहसंस्थेकडे तुलनात्मक दृष्टीने पाहतां अेका पुरुषाला अनेक बायका असण्याची चाल अेके काळीं सार्वत्रिक होती, म्हणजे पुरुषाला कायदेशीर रीतीने अनेक बायका करतां येत असत. हल्ली जरी पुष्कळ देशांत अेकपत्नीत्वाची कायद्याने सक्ती आहे, तरी कायदेशीर बायकोच्या जोडीला अितर बायकांशीं पुष्कळ लोक संबंध ठेवतात आणि हें जरी उघड सांगतां येत नाहीं, तरी पुष्कळ वेळां तें फारसें गुपित नसतें आणि राजेरजवाड्यांसारख्या बड्या लोकांच्या रखेल्या तर उघडपणें मिरवतात.

जेथें अनेक बायका कायद्यानें करतां येतात, तेथें सुद्धां त्यांत दोन प्रकार आढळतात. अनेक लग्नाच्या बायका असून सर्वांचा दर्जा सारखाच असणें किंवा एखादी मुख्य बायको असून अितरांना गौण स्थान असणें हा अेक प्रकार, आणि लग्नाची अेक किंवा अनेक बायका असून शिवाय रखेल्या ठेवण्यासही कायद्याची परवानगी असणें, हा दुसरा प्रकार. आजपर्यंतच्या हिंदू कायद्यांत बायका किती असाव्यात याला मर्यादा नव्हती आणि रखेल्या ठेवण्याचीही कायदेशीर परवानगी होती, कारण अशा रखेल्यांना कायद्याने पोटगी मिळत असे. महंमदी धर्मांत चारपर्यंत बायका करतां येतात आणि शिवाय पाहिजे तितक्या रखेल्या ठेवतां येतात आणि या कायद्यांत अजून फरक झालेला नाही.

हल्लींच्या अेकपत्नीव्रतच कायदेशीर मानणाऱ्या देशांत जरी रखेल्या असल्या, तरी वरील दोन प्रकारांत आणि या प्रकारांत अेक मोठा फरक असतो, तो हा कीं रखेल्या कायदेशीर असल्या तर लग्नाच्या बायकोला त्याबद्दल तक्रार करतां येत नाहीं, पण जेथें त्या कायदेशीर नसतात, तेथें नवऱ्याने रखेली ठेवल्यास किंवा व्यभिचार केल्यास बायकोला त्या सबबीवर घटस्फोट मागतां येतो. तसेंच रखेली कायदेशीर असेल तेथें तिच्या मुलांनाही कायदेशीर पोटगी मागतां येते, पण ती कायदेशीर नसल्यास तिच्या मुलांना कोणताही हक्क नसतो आणि तीं अनौरस ठरून त्यांना समाजांत दर्जा रहात नाही. अेक महत्वाची गोष्ट येथें लक्षांत घेतली पाहिजे की अेकपत्नीत्वाची प्रथा आधुनिक आहे आणि क्रिस्ती देशांत जरी ही प्रथा असली तरी बायबलांत अनेकपत्नीत्वाचा निषेध सांपडत नाहीं. अेकपत्नीत्वाचा कायदा होण्यापूर्वी फक्त बिशपच्या दर्जाच्या धर्माधिकाऱ्यांना अनेक बायका करण्याची बंदी होती. बायबलांतील सॉलोमन राजाला शेंकडों बायका होत्या आणि डेव्हिड नेहमी दोन बायकांना प्रवासांत बरोबर नेत असे. क्रिस्ती लोक बायबलांतील फक्त नवा करार मानतात, पण त्यांतही अनेकपत्नीत्वाला बंदी नाही. सारांश अेकपत्नीत्व अगदी अलीकडचें आहे.

आग्नेय आफ्रिकेंत काफर लोकांच्या अेका राजाच्या घरीं पहाटेच्या वेळीं अेक फ्रेंच प्रवासी गेला असतां त्याला पुढील प्रकार दिसला. राजाच्या भोंवतीं दहा नग्न स्त्रिया होत्या. त्यांपैकीं अेक त्याने उशाला घेतली होती. दुसरी उजव्या हाताखालीं आणि तिसरी डाव्या हातखालीं होती. चौथी उजव्या पायखालीं होती, पांचवी डाव्या पायावर आडवी निजली होती आणि बाकीच्या पांचांना तात्पुरती सुटी होती. त्या राजाच्या अेकंदर पांचशें बायका होत्या.

सीब्रुक नांवाच्या अेका प्रवाशाने पश्चिम आफ्रिकेंतील अेका खेड्यांतील पुढील वर्णन दिलें आहे. तेथील प्रमुख वारल्यामुळें त्याच्या आठ बायका आतां मुलाच्या ताब्यांत आल्या होत्या, म्हणजे आतां त्या त्याच्या बायका

होत्या. त्यांना आम्ही भेट दिली. त्या गुण्यागोविंदानें अेकमेकींना घरकामांत मदत करीत होत्या. अेक मुलाला पाजीत होती. हें मूल वारलेल्या प्रमुखाचें, पण तो मेल्यावर जन्मलेलें होतें. आणखी दोन बायका मुलापासून गरोदर होत्या. हल्लीच्या पाश्चिमात्यांना या कुटुंबसंस्थेची कल्पनाही होणार नाहीं.

हल्ली देखील यूरोपशिवाय अितर खंडांतील मूळच्या रहिवाश्यांत बहु-पत्नीकत्वाचीच परंपरा आहे. हिंदुस्थानांत मात्र कायदा बदलण्याचा विचार चालू आहे. कांही प्रांतांत तो अगोदरच बदललेला आहे. चीन, जपान, वगैरे मंगोल देशांत नांवाला अेकपत्नीत्वाचा कायदा असला तरी रखेल्यांना मुभा आहे. कित्येक ठिकाणीं यूरोपीयांच्या चेष्टेला आपण पात्र होऊं नये म्हणून अलीकडेच अेकपत्नीत्व कायद्यांत शिरलें आहे, तरीपण दोन बायका करणें हा भयंकर गुन्हा मानलेला नाही. उदाहरणार्थ ' हडसन बे ' मधील अेस्किमो लोकांत एकच बायको असते, पण कोणी अेखाद्याचा खून केला तर त्याला अेक बायको असली तरी मृताच्या विधवेशीं लग्न करण्याची त्याच्यावर सक्ती असते.

मुसलमानांकरतां सिदी खलील याने असा दंडक केला आहे की पुरुषाने आपल्या रात्रींची वांटणी सर्व बायकांत सारखी केली पाहिजे आणि जिच्याकडे रात्र काढली तिच्याकडेच पुढचा दिवसही काढला पाहिजे. कोणीं अेक बायको असून कुमारिकेशीं लग्न केलें, तर त्याने सात रात्री या नव्या बायकोकडे काढल्या पाहिजेत, पण ती कुमारी नसेल तर तीनच रात्री रहावें. अेखाद्या बायकोने अधिक राहण्याचा आग्रह केला तर त्याने नकार दिला पाहिजे.

चिनी पुरुषाला अेक मुख्य बायको असते, पण तिच्या जोडीला आणखी बायका कोणत्याही विधीशिवाय केवळ विकत घेऊन घरांत ठेवतां येतात आणि याला कायद्याची हरकत नसते. सारांश कायद्याच्या सक्तीने देखील कोणत्याही देशांत पुरुष अेका बायकोवर संतोष मानून राहत नाहीत आणि कमीअधिक उघडपणें अितर बायकांशीं सबंध ठेवतात. अिंग्लंडसारख्या सोंवळ्या देशांत देखील अशा गोष्टी जवळ जवळ उघडपणें होतात. आपला

नवरा अितरांशीं संबंध ठेवतो हें बायकांना माहीत असतें, अितकेंच नव्हे तर पुष्कळ वेळां त्या त्यांच्या ओळखीच्या असतात आणि घरींही येतात. बायकांना अनेक पुरुष मिळणें थोडें अधिक कठिण असतें, पण त्याही शक्य तर मिळवतात आणि नवरेही तिकडे काणाडोळा करतात असें अनेक वेळां घडतें. सारांश अेकेरी विवाह हा अेक कायद्याचा जुलूम आहे, असें मानणारे बरेच लोक यूरोपांत देखील आहेत आणि ते कायदा पाळण्याचा देखावा करीत असले तरी प्रत्यक्ष पाळीत नाहींत.

स्त्रिया निसर्गतःच अेकनिष्ठ असतात अशी जरी पुरुषांची समजूत असली, तरी ती केवळ स्त्रियांच्या गुलामगिरीमुळेंच उत्पन्न झालेली आहे. पण आतां स्त्रियांना जसजसें अधिकाधिक स्वातंत्र्य मिळत आहे, तसतशी ही समजूत नाहीशी होत आहे आणि आपल्याकडेही प्राचीन काळापासून 'स्त्रियश्चरित्रं' या सदरांत येणाऱ्या अितक्या गोष्टी प्रसिद्ध आहेत की त्यांनी अशा समजुतीला बराच बाध येतो. पुरुषांना तर कोणतीही स्त्री बरी दिसली की हवीशी वाटते, हा आरोप सर्वस्वी खोटा नाही, मग तो कोणी कबूल करो की न करो. आणि स्त्रियाही या बाबतींत पुरुषांपेक्षां फारशा भिन्न नसतात, मग त्यांना संधि मिळो की न मिळो. गटे याने फाउस्टमध्यें नायकाला सैतानाजवळ असें म्हणायला लावलें आहे की जी मला आलिंगन देत असतांनाच दुसऱ्याला डोळा घालणार नाही, अशी स्त्री मला देशील का? निदान अितकें तरी कबूल केलेंच पाहिजे की स्वभावतः अेकनिष्ठ असे जरी कांही पुरुष आणि स्त्रिया सांपडतील, तरी अनेक स्त्रिया व पुरुष निःसंशय याच्या उलट वृत्तीचे असतात. तरमग या सर्वांना अेकच कायदा लावणें योग्य आहे काय?

अेका पुरुषाला पुष्कळ बायका असणें हें अेके काळीं सार्वत्रिक होतं, परंतु अेका स्त्रीला अनेक पति असणें ही पद्धत त्या मानाने फारच कमी आढळते. यांतही दोन प्रकार आहेत. अेक प्रकार म्हणजे या अनेक नवऱ्यांचें आपसांत कांही नातें नसतें, आणि दुसरा म्हणजे अेका कुटुंबांतील सर्व भावांची मिळून

अेकच बायको असते. ही दुसरी पद्धत तिबेटमध्यें सापडते. या भावांच्या वयांत पुष्कळ अंतर असूं शकतें, पण त्या सर्वांची मिळून अेकच बायको असते. हिची निवड मोठ्या भावाने करायची असते. कांही भाऊ तर लहान मुलेंच असतात आणि त्यांचें मत कोणी विचारीतही नाही आणि तरी त्यांचें आपोआप लग्न होतें. लग्नाचे विधींत या सर्वांची नांवें सांगितलीं जातात. ते सर्व अेकत्र राहतात. तिला जीं मुलें होतील तीं थोरल्या भावाचीं समजतात आणि अितर भाऊ चुलते होतात. हें लग्न जर अेखाद्या भावानें अमान्य केलें तर बापाच्या मिळकतीवर त्याचा हक्क रहात नाही. त्यांचा धर्मगुरु ( लामा ) जेव्हां लग्न लावतो, तेव्हां तो वधूला नवऱ्याशीं व त्याच्या भावांशीं अेकनिष्ठ ( ? ) राहण्यास सांगतो. पण तिला मुलें झालीं नसलीं तर तिला अेखादा प्रेमिकही निवडता येतो आणि नवरे त्याला हरकत घेत नाहीत. अेखाद्याला भाऊ नसले तर त्याला अेकट्याला बायको मिळणार नाही, म्हणून तो पैसे भरून दुसऱ्या अेखाद्या कुटुंबांत त्यांच्या संमतीने अेक भाऊ बनतो आणि स्त्रीला आणखी अेक नवरा मिळतो. या सर्वांचे पत्नीकडे जाण्याचे दिवस ठरलेले असतात आणि त्यांच्यांत भांडणें न होऊं देण्यांत पत्नीचें कौशल्य असतें. अशा स्त्रीला सर्व लोक आदर्श पत्नी म्हणून वाखाणतात. द्रौपदीची गोष्ट अशीच नाही काय ? आणखी कर्णही आपला पति असता तर बरें झालें असतें, असें तिलाही वाटलें होतें. तिला आदर्श पत्नी समजतातच आणि तिचेही दिवस वांटून दिलेले होते. तिबेटकडचे कांही लोक आपल्याला पांडवांचे वंशज समजतात, तेव्हां या दृष्टीने पांच पांडवांची अेक बायको असावी यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीच नाही. शिवाय श्रीकृष्णाने त्यांना प्रत्येकीं आणखी अेक अेक बायको करण्याचा उपदेश केला, पण या दुसऱ्या बायकोवर मात्र अितर भावांचा हक्क नव्हता.

पश्चिम मंगोलिआंत काल्मूक नांवाच्या लोकांत ही चाल अजूनही चालू आहे. चिनी लोकांनी ही मोडण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ. न्यूबिआमधें अशी चाल आहे की दोन स्नेही मिळून अेक बायको विकत घेतात

आणि ती पाळीपाळीने दोघांजवळ राहते. कॅनरी बेटांत अेका स्त्रीला तीन-पर्यंत नवरे करतां येतात. अरब लोकांतही अेके काळीं ही चाल होती, अितकेंच नव्हे तर गरिबांचीं लग्नें याच पद्धतीने होत असत, कारण अेकट्याला बायको पोसणें कठिण जाअी. कांही लोकांत अशी चाल आहे की नवरा निवडण्याचा हक्क स्त्रीला असतो व याकरतां दोघांना अेक रात्र व अेक दिवस अेकत्र काढण्याचा हक्क असतो आणि तिने आपली पसंती दर्शवल्यास आणखी कोणत्याही विधीशिवाय ती त्याची व त्याच्या भावांची पत्नी होते. त्या सर्वांना तिच्यावर सारखाच हक्क असतो.

या अनेक नवऱ्यांना अेकमेकांबद्दल असूया वाटत नाही आणि त्यांच्यांत यावरून भांडणेंही होत नाहीत. यावरून असूया ही नैसर्गिक नसून कृत्रिम कायद्यांमुळें व चालीरीतींमुळें उत्पन्न होते हें उघड दिसतें. वस्तुतः अेक-मेकांच्या संमतीने अनेक स्त्रियांना अेकच पति किंवा अेका स्त्रीला अनेक पति असणें यांत वावगें कांहीच नाही. पाश्चात्य सुधारणेच्या दृष्टीने तें वावगें दिसतें, कारण त्यांनी पतिपत्नींच्या अेकमेकांच्या शरीरावर मालकीहक्कासंबंधी भलभलत्या कल्पना करून घेतल्या आहेत. या चाली पुष्कळ वेळां पुरुषांच्या व स्त्रियांच्या संख्येच्या विषमतेमुळें उत्पन्न होतात. प्रत्येकाच्या वांटणीला जेथें बायको येत नसेल, तेथें पुष्कळांनी मिळून अेक बायको केली तर त्यांत बिघडलें काय ? यांत नांवें ठेवण्यासारखें कांहीच नाही.

---

# संपादकीय

मागील अंकांत लिहिल्याप्रमाणें २० जुलै रोजीं या मासिकाला २५ वर्षें पुरीं झाल्याच्या निमित्ताने ब्लॅव्हॅटस्की लॉजमधें श्री. स. का. पाटील अेम्. पी. यांच्या अध्यक्षतेखालीं आमच्या सत्कारसमितीने अेक जाहीर सभा भरवून आम्हास त्यांच्या हस्तें रु. ५६०० ची थैली अर्पण केली. ही समिति आमच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त निर्माण झाली होती व तिने जवळजवळ अेक

वर्ष खटपट करून ही रकम जमा केलेली होती. वाढदिवसाचा समारंभ १४ जानेवारी रोजीं त्याच ठिकाणीं झाला होता, परंतु त्या वेळीं फारच थोडी रकम जमा झालेली असल्यामुळें थैलीचा समारंभ लांबणीवर टाकावा लागला होता व तो मासिकाच्या जुबिलीच्या निमित्ताने जुलैमधें समितीने घडवून आणला. दोन्ही प्रसंगीं कित्येक सन्मान्य वक्त्यांनीं आमच्या तीस वर्षांच्या कामगिरीबद्दल स्तुतिपर भाषणें केलीं, त्यांबद्दल येथें आम्ही त्यांचे जाहीर आभार मानतों. समितीच्या सभासदांनी व विशेषतः कार्यवाह श्री. अनंतराव गद्रे व शि. न. कोल्हटकर यांनी या बाबतींत जे परिश्रम केले, त्यांबद्दल त्यांचे विशेष आभार मानणें जरूर आहे. ही थैली आमचें कार्य पुढें चालू रहावें याकरतां दिलेली आहे, तेव्हां हें मासिक शक्य तितके दिवस चालू ठेवण्याचा आमचा उद्देश आम्ही मागील अंकांतच जाहीर केलेला आहे.

बहुतेक वृत्तपत्रांनी देखील आमच्या कार्याचा गौरवच केला आहे. परंतु या सर्वाला गालबोट म्हणून प्रा. ना. सी. फडके यांनी 'नवभारत' मधें ( १९ जुलैच्या अंकांत ) आम्हाला अेकट्यालाच संततिनियमनाचे आद्य प्रवर्तक असल्याचें श्रेय देणें चुकीचें आहे असें लिहिलें आहे. त्याही लेखांत आमची बरीच स्तुति आहे, तीबद्दल प्रा. फडक्यांचे आभार मानलेच पाहिजेत, परंतु त्यांनी केलेलें वरील विधान मात्र खरें नाही हें नमूद करणें जरूर आहे. त्याला त्यांनी कोणताही पुरावा दिलेला नाही. दुसरा कोणी आद्य प्रवर्तक त्यांच्या मताने असेल, तर तसें त्यांनी सांगायला व दाखवायला पाहिजे होतें. त्याचें स्वतःचें या विषयावरील पुस्तक १९२५ सालीं प्रसिद्ध झालें, त्यावेळीं आमच्या मराठी पुस्तकाच्या दोन आवृत्त्या निघालेल्या होत्या व शिवाय आम्ही १९२१ सालींच अेक अिंग्रजी पुस्तक याच विषयावर प्रसिद्ध केलें होतें व संततिनियमनाचें अेक केंद्र स्थापन करून गरजूंना प्रत्यक्ष साधनांचा उपयोग कसा करावा हें शिकवण्यास आरंभ केला होता. त्यापूर्वी यासंबंधी कोणीही लिहिलें नव्हतें आणि तें जाहीरपणें प्रत्यक्ष कोणीही शिकवीत नव्हतें. अशा स्थितींत आम्हाला आद्य प्रवर्तक म्हणणें चूक आहे

असें ते कोणत्या आधारावर म्हणतात, असा जाहीर सवाल आम्हाला सभेंत करावा लागला. याशिवाय त्यांनी वरील लेखांत आमची थोडी नालस्तीही केली आहे. ते लिहितात की आमच्या मासिकांत 'गलिच्छ कामुक मजकूर' भरपूर असतो. आमच्यावर तीन खटले झाले, त्यांत सरकारी वकिलाला देखील असा मजकूर दाखवतां आला नाही, कारण पहिल्या वेळीं आमच्या लेखांत मोठ्या प्रयत्नाने त्याला 'वेश्या' हा अश्लील शब्द सांपडला! अर्थात् ज्याचें मन अश्लील, त्याला सर्वच अश्लील दिसतें, तसाच फडक्यांनाही कांहीं मजकूर गलिच्छ वाटला असेल, परंतु तो मतभेद आहे अितकेंच आम्ही म्हणतों. आणि मतभेद हा प्रत्येकाचा हक्क आहे. अर्थात् खोटीं विधानें करणें हा देखील गुन्हा नाही, तेव्हां तीं वाटल्यास करावीं.

---

# ग्रंथपरीक्षण

**संस्कृति-समस्या** ( हिंदी ), लेखक स्वामी सत्यभक्त, प्रकाशक, सत्याश्रम, वर्धा. पृ. १५०, किंमत दीड रुपया. ( तीन शिलिंग ).

प्रस्तावनेंत सांगितलें आहे की मानवसंस्कृतींत सुधारणा करण्याच्या दृष्टीने अनेक गोष्टींचा विचार यांत केलेला आहे. यांत एकंदर २१ लेख आहेत. पहिल्या लेखाचें नांव 'समाज और संस्कृति' आहे व बहुतेक लेखांचे विषय सामाजिक किंवा धार्मिक आहेत. स्वामीजी सर्व धर्मांना सारखाच मान देतात व प्रत्येक धर्मांतून जें घेण्यासारखें असेल तें घ्यावें, व तें काय हें ठरतांना चालू युगांत उपयुक्त काय आहे हें पहावें असें म्हणतात. लेखकाची दृष्टि सर्वसंग्राहक आहे व कोणालाही अपमान वाटूं नये हाच सर्वधर्मसमभावाचा उद्देश दिसतो. लेखक स्वतःला बुद्धिवादी म्हणवतो, परंतु केवळ वैज्ञानिक दृष्टीने सत्य असेल तेवढेंच घ्यावें व बाकीचें टाकाऊ ठरवावें असें त्याचें मत नाही. उदाहरणार्थ अीश्वराचें अस्तित्व जरी सिद्ध होण्यासारखें नसलें, तरी आंधळ्याला किंवा लंगड्याला जसा काठीचा उपयोग असतो, तसा कित्येकांना अीश्वराचा उपयोग होतो, तेव्हां अीश्वर, आत्मा वगैरे देखील

या दृष्टीने उपयुक्त आहेत. आमचे मतें अशा लोकांनीं अीश्वर खुशाल मानावा, परंतु अीश्वराच्या कल्पनेचा सत्याशीं मात्र कांहीं संबंध नाही, हें बुद्धिवाद्यांनी ठामपणें सांगितलें पाहिजे. अर्थात् असें सांगितल्याने सर्वसंग्रहाला बाध येअील हें खरें, आणि स्वामीजींचा उद्देश जगांतील शक्य तितका विरोध नाहीसा करण्याचा आहे, तेव्हां त्यांना फारसा दोष देतां येत नाही. परंतु ही निर्भेळ सत्याची दृष्टि नव्हे. स्वामीजींची दृष्टि आधुनिकच आहे, पारंपरिक नाही, हें पुढील वाक्यावरून स्पष्ट होअील ( पान ८ ) ‘ अपनी विशेषता रखनेके लिये या प्राचीनताके मोहके कारण किसी संस्कृतिसे चिपटे रहना मनुष्यताकी कमी सिद्ध करना है। पुरानी बात अच्छेपनके कारणही जिंदी रहना चाहिये, अपनेपनके कारण, या प्राचीनताके कारण नहीं। ’ म्हणजे कोणतीही जुनी गोष्ट चांगली असेल तरच जिवंत ठेवावी, ती आपली आहे किंवा प्राचीन आहे म्हणून नव्हे. पुस्तकांत पुष्कळच विषय आहेत व या सर्व लेखांचा येथें परामर्ष घेणें शक्य नाही. स्वामीजींना मांसाहार पसंत नाही, परंतु आमचे मतें मांसाहार अिष्ट आहे अितकेंच नव्हे तर सर्वांनी शाकाहार करण्याचें ठरवल्यास तें अशक्य आहे व केव्हांही शक्य होणार नाही. खरी गोष्ट अशी आहे की गरीब देशांतील लोकांना मांसाहार परवडत नाही. विपुल मांसाहार करणाऱ्या अिंग्लंडांत देखील हल्ली लोकांना मांस दुर्मिळ झालें आहे. शाकाहाराचा प्रसार आणि प्रचार हिंदुस्थानांतच विशेष झाला यावरून हेंच दिसतें. यांतील बहुतेक लेख खोल विचार करून लिहिलेले आहेत, मग ते कोणास पटोत वा न पटोत.

**र. धों. क.**

**२. लो. टिळक पुत्रांचीं स्मृतिचित्रें**, अथवा टिळक-पुत्र-भारत, भाग १ ला. लेखक, रामभाऊ टिळक. प्रकाशक, रा. ब. टिळक, ५६८, नारायण पेठ, पुणें-२. पृ. ३९८, किं. रु. ६.

या पुस्तकांतील स्मृतिचित्रें पूर्वी ‘ प्रतोद ’ साप्ताहिकांत ३-११-४६ पासून ९-५-४८ च्या अंकांत प्रसिद्ध झालेलीं आहेत. तीं संकलित करून हा पहिला भाग तयार केलेला आहे. हीं स्मृतिचित्रें असल्यामुळें अर्थातच यांत

लोकमान्यांचें समग्र चरित्र नाही, तरीपण लेखक सहा वर्षांचा झाल्यापासूनच्या आठवणी आहेत, आणि त्या फार मनोवेधक आहेत यांत शंका नाही. लोकमान्य वारल्यानंतर न. चिं. केळकरांच्या स्वार्थी धोरणामुळें लेखकाचे कसकसे हाल झाले ही हकीकत यांत आहेच, परंतु त्याचबरोबर अनेक मनोरंजक हकीकतीही यांत आलेल्या आहेत. शिवाय टिळकांशीं ज्यांचा कांहीं कारणाने संबंध आला, अशा बऱ्याच मोठमोठ्या लोकांच्या आठवणीही यांत साहजिकपणें आल्या आहेत व यामुळें ग्रंथ विशेष वाचनीय झाला आहे. यांत अनेक छायाचित्रेंही घातलीं आहेत, यामुळें पुस्तकाच्या आकर्षणांत भर पडली आहे.

र. धों. क.

---

# पत्रव्यवहार

## १

१. 'मैत्रीण पाहिजे' अशा अनेक जाहिराती आपल्या मासिकांत प्रसिद्ध होतात. त्यांना आपल्या पत्त्यावर उत्तरें येतात काय? कुणाला अशा तऱ्हेने मैत्रीण मिळाल्याचें आपणास समजलें आहे काय? २. मागें अेकदां कुणा 'क्ष' व्यक्तीने नग्नसंघाला अनुकूल मित्रमैत्रिणी पाहिजेत म्हणून जाहिरात दिली होती, त्या वेळीं अर्ज करण्याची संधि मिळाली नाही. 'क्ष' यांना नग्नसंघ काढण्यांत यश मिळालें काय? असल्यास कृपा करून आम्हाला त्यांचा पत्ता द्यावा. आम्ही देखील संघांत सामील होऊं इच्छितों. ३. संभोगापेक्षां नग्न शरीराचें आम्हाला अत्यंत आकर्षण वाटतें. दिवसाचे चोवीस तास कांहीं सुचत नाही, फार विचार केल्यामुळें निरतिशय सुस्ती येते, कामधंदा नीटपणें होत नाही, कशांतही स्वारस्य वाटत नाही, प्रकृति अस्वस्थ, आर्थिक परिस्थिति बरी नाही, मानसिक स्थितिही वरील कारणांमुळें बिघडलेली, म्हणून लग्न करण्याचा धीर होत नाही. वेश्येच्या घरीं कामुक संभाषण, प्रेमक्रीडा, वगैरेच्या अभावीं केवळ संभोगाने मनःस्वास्थ्य लाभणें शक्य नाही. म्हणून अशाच तऱ्हेचा मानसिक त्रास होणाऱ्या तरुणीचा निदान सहवास

लाभला तरी पुरे असें वाटतें. मी ‘ मैत्रीण पाहिजे ’ अशी जाहिरात दिल्यास आपण स्वीकाराल काय ? ४. आम्हास होणाऱ्या मानसिक त्रासाप्रमाणेंच ज्या मित्रमैत्रिणींना होत असेल, त्यांच्याशीं पत्रव्यवहार करण्याचा अेखादा मार्ग सुचवाल काय ? हेतु हा की अेकमेकांचीं सुखदु:खें कळल्यामुळें मनावरील भार कमी होअील. ५. आपले जुने अंक चाळून पाहातां त्यांत अमुक प्रसंगीं कसें होअील अशी आशंका वाटणारांसाठी कामोत्तेजक व शक्तिवर्धक औषधांच्या जाहिराती येत असत. तीं औषधें हल्ली विक्रीस कां ठेवीत नाही ? तें शक्य नसल्यास कृपा करून अेखाद्या सारक, पाचक, शक्तिवर्धक व कामोत्तेजक औषधाचें नांव सुचवावें. ‘ क्लैब्याची मीमांसा ’ पुस्तकांत दिलेले डाक्तरांनी करायचे उपचार मला वाटतें फार महाग पडतील, म्हणून ही विनंती करीत आहें. ६. केवळ मानसिक भीतीमुळें अिंद्रियाला शैथिल्य येणें शक्य आहे काय ? उत्थापन झाल्यावर अिंद्रियाला बधिर करणारें अेखादें मलम सुचवाल काय ? आपला ‘ **सारंग.** ’

उ. १. कांही उत्तरें येतात, परंतु नंतर त्यांचें पर्यवसान काय होतें हें अर्थातच आम्हास समजत नाही. २. नग्नसंघांसंबंधी पुष्कळ लोक बोलतात, परंतु आजपर्यंत हिंदुस्थानांत अेकही नग्नसंघ अस्तित्वांत आल्याचें आमच्या अैकिवांत नाही. ३. जाहिरात स्वीकारण्यास आमची हरकत नाही. ४. पुष्कळ वर्षांपूर्वीं आम्ही असा प्रयत्न केला होता, परंतु प्रत्यक्ष पत्रव्यवहारांत पुष्कळांना जरूर तो संयम पाळतां न आल्यामुळें तक्रारी होऊं लागल्या, म्हणून तो प्रयत्न आम्हांस बंद करावा लागला. कोणाला काय लिहिलें तर चालेल, हें समजण्याअितकी अक्कल नसली म्हणजे साहाजिकच तक्रारी होतात. ५. औषधांसंबंधी हल्लीच्या कायद्याप्रमाणें वेगळा कारखाना काढल्याशिवाय कोणालाही औषधें तयार करतां येत नाहींत, यामुळें आम्हास तीं बंद करावीं लागलीं. आपण म्हणतां ते सर्व गुण कोणत्याही अेका औषधांत सांपडणार नाहीत. ६. शक्य आहे आणि असें पुष्कळ वेळां होतें. बधिर केल्याचा परिणाम चांगला होणार नाही. **सं.**

२

१. मागें अेका पत्राला उत्तर देतांना आपण म्हटलें आहे की संभोगानें नुकसान होतें तें वीर्यनाशामुळें नव्हे, तर संभोगाच्या वेळीं शरीरावर जो ताण पडतो, त्याची फाजील पुनरावृत्ति झाल्यामुळें होतें. हा शरीरावर पडणारा ताण कोणकोणत्या अिंद्रियांवर पडतो? दुसरी शंका अशी कीं शरीरांतील यच्चयावत् अिंद्रियांचा आम्ही दररोज उपयोग करीत असतों व योग्य झोप व आहार मिळाल्यावर निरोगी माणसावर त्यामुळें कोणताच वाअीट परिणाम होत नाही. तरमग संभोगेंद्रियांचाच दररोज उपयोग केल्यास नुकसान कां व्हावें? २. लंगोट नेसण्याची आवश्यकता आहे काय? अेरवीं नाही तरी निदान सायकलवर बसतांना तरी जरूर आहे काय? ३. जंतुनाशक म्हणून रबरी पिशव्या धुण्यास किंवा गुप्तरोगप्रतिबंधक म्हणून शिस्नाचा पुढील भाग बुडवून ठेवण्याकरतां व योनिमार्ग धुण्याकरतां 'डेट्टॉल' चें पाणी वापरल्यास चालेल काय? या पद्धतीने मूत्रमार्गांत अगोदरच शिरलेले जंतु कसे मरणार? मूत्रमार्गांत हें पाणी जातें काय? ४. मागें अेका उत्तरांत आपण म्हटलें आहे त्याप्रमाणें जे लेखी परवानगी देतील त्या वर्गणीदारांचीं नांवें दर अंकांत थोडींथोडीं छापण्याचें आपण अद्याप मनावर घेतलेलें दिसत नाही. तसें केल्यास समविचारांची माणसें कोण आहेत हें समजेल व शक्य तर परिचयही करून घेतां अेअील. माझें नांव व पत्ता वर्गणीदार म्हणून छापण्यास मी येथेंच परवानगी देत आहें. तरी आपला विचार काय तें कळवावें. ५. 'कुमारांचा सोबती-पुरवणी,' हें पुस्तक आपल्या पाहण्यांत आहे काय? डॉ. वा. ना. वेलिंकरच्या सहाय्याने हें पुस्तक लिहिलें आहे, तेव्हां आपल्यासारख्या तज्ञाचें त्यावरील परीक्षण महत्वाचें आहे, तरी तें जरूर करावें. ६. आपले वडील महर्षि धों. के. कर्वे हे सध्यां जातिभेदाच्या उच्चाटनाचें कार्य करीत असतात असें वाचलें. त्याकरतां त्यांनी अेक मंडळही काढल्याचें अैकलें. तरी त्याची माहिती द्यावी व मंडळाचा पत्ता द्यावा. कारण त्या कामगिरीस कसा हातभार लावतां येअील हें मला पहावयाचें आहे. ७. आपण 'पॅरिसच्या परी' ची द्वितीय आवृत्ति

काढलीत, पण 'मासिकांतील निवडक लेख, भाग १ ला' हें आज कित्येक वर्षें उपलब्ध नाही. मग त्याचें पुनर्मुद्रण करण्याचें कां मनावर घेत नाही? हें जास्त महत्वाचें नाही का? ८. आपलीं सारीं पुस्तकें मी विकत घेतलीं आहेत. डॉ. नॉर्मन हेअर यांचें 'अेनसायक्लोपिडिया ऑफ सेक्शुअल नॉलेज' हें पुस्तक आणखी विशेष माहिती देईल का? त्यांच्या 'जर्नल ऑफ सेक्स अेज्युकेशन'ची अेखादी अलीकडची किंवा जुनी प्रत नमुन्यासाठी मला पाठवाल काय? आपला चाहता, **रा. स. प्रभु**, टांक (रत्नागिरी) शिरोडामार्गें.

उ. १. हा ताण चेतांवर (मज्जातंतूंवर) पडतो आणि अतिरेक झाल्यास प्रकृति बिघडते. ताण सहन करण्याच्या बाबतींत सर्व अिंद्रियें सारखीं नसतात. उदाहरणार्थ हृदयाचें काम चोवीस तास चालू असतें, पण सर्वच अिंद्रियांना असें काम सोसणार नाही. संभोगाचे बाबतींत तर व्यक्तींत अतिशय फरक सांपडतो. कित्येकांना दिवसांतून तीनदां संभोगाची गरज भासते व ती भागवली तरी त्यांचें कोणतेंही नुकसान होत नाही. कित्येकांना वर्षांतून तीनदां देखील पुरेसा वाटतो. 'बल ज्याचें त्यास तें.' स्वतःचें बल किती आहे हें ओळखून प्रत्येकानें वागलें पाहिजे, तरच प्रकृति नीट राहण्याचा संभव. २. जेव्हां लोंबत्या बीजकोशांना अिजा होण्याचा संभव असेल (उदाहरणार्थ कुस्तींत किंवा अितर व्यायामांचे वेळीं) तेव्हां लंगोट वापरावा, अितर वेळीं वापरूं नये, कारण त्यामुळें त्या भागाला हवा मिळत नाही. ३ 'डेट्टॉल' हें कडक औषध आहे व तें वापरणें झाल्यास त्याच्या बाटलीवर जें निरनिराळ्या उपयोगांकरतां प्रमाण दिलेलें असतें, त्या प्रमाणांतच तें वापरलें पाहिजे. मूत्रमार्गांत जंतु शिरण्यास वेळ लागतो, ताबडतोब शिरत नाहीत, कारण संभोगाचे वेळीं रेतानेंच तो धुवून निघतो व नंतर नुसत्या साबणाच्या पाण्यानेंही आजूबाजूचे जंतु धुवून निघतील. ४. आपल्या विनंतीप्रमाणें आपलें नांव व पत्ता पत्राच्या शेवटीं छापला आहे. ५. आम्ही स्वतः विकत घेऊन कोणत्याही पुस्तकाचें परीक्षण करीत नाही. तें आमचेकडे लेखकाकडून किंवा प्रकाशका-

करून परीक्षणार्थ आलें असेल, किंवा अेखाद्या वाचकाला जरूर वाटल्यास त्यानें तें आमचेकडे परीक्षणाकरतां पाठवलें असेल, तरच आम्ही परीक्षण करतों. ६. आमच्या वडिलांचा पत्ता ' १२९ अ, लॉ कॉलेज रोड, पुणें–४, असा आहे. त्यांना लिहिल्यास सर्व माहिती मिळेल. ७. ' पॅरिसच्या परी ' याची पहिली आवृत्तिही आम्ही काढली नव्हती व दुसरीही आम्ही काढली नाही. हल्ली प्रकाशनाला बराच खर्च येतो व आमचीं स्वतःचीं नवीन पुस्तकें देखील प्रसिद्ध करण्यास पुरेसा पैसा आमचेजवळ नाही, कारण जरूर तेव्हां चालू पुस्तकांच्या नव्या आवृत्त्या काढणें हें अधिक महत्वाचें असतें. निवडक लेखांच्या पहिल्या भागाचा खप चांगलासा न झाल्यामुळें व नवीन पुस्तकांना जागा करण्याकरतां आम्हाला त्याच्या कांही प्रती काढून टाकाव्या लागल्या होत्या. दुसऱ्या भागालाही फारशी मागणी नाही, तेव्हां पहिला भाग पुन्हा छापण्यांत नुकसानच होअील व तें सोसण्याची ताकत नाही. ८. सदर पुस्तक आम्ही पाहिलेलें नाही, परंतु ज्या फ्रेंच पुस्तकाचें तें भाषांतर आहे, त्या मूळ पुस्तकाचीं मोठ्या ( म्हणजे ९×६॥ अिंच ) आकाराचीं ५५५ पानें आहेत. तेव्हां आमच्या पुस्तकापेक्षां जास्त माहिती त्यांत साहजिकच असणार. ' जर्नल ऑफ सेक्स अेजुकेशन ' ची जुनी प्रत देखील आम्ही पाठवणार नाही. सं.

३

१. ' लोकसत्ता ' कार ' आमचे वाचक काय म्हणतात ? ' या सदराखालीं शंका व निरसन देण्याचें कार्य करीत असतात. त्यांनी २२–५–५२ चे अंकांत श्री. भ. य. पेंडसे यांचा ' मातृत्व हेंच श्रेष्ठ कर्तव्य ' हा लेख छापला होता व तो वाचून मीं पुढील शंका विचारल्या होत्या. लग्नाशिवाय कामविकाराचें शमन म्हणजे व्यभिचाराचें अवलंबन, तरी लग्नें नैसर्गिक आहेत काय ? लग्नसंस्था श्वेतकेतूने केली, त्याच्या अगोदरचा समाज व्यभिचारी समजायचा काय ? श्री. अहल्याबाअी व लक्ष्मीबाअी विधवा झाल्या ही परमेश्वराची कृपा, असें म्हटलें आहे, पण लग्नसंस्था नव्हती तेव्हां स्त्रिया विधवा होत नव्हत्या, तरी त्या वेळीं परमेश्वर नव्हता काय ? २. लग्नाशिवाय

मुलें झालीं तरी त्यांत मुलांचा दोष नसतो, तेव्हां त्यांना कमी कां मानावें? वगैरे शंका विचारल्या होत्या, त्या लोकसत्ताकारांनी छापल्या नाहीत, तरी आपण शंकानिरसन कराल अशी आशा आहे. **दत्तात्रय शिवराम चिखले.**

उ. १. विवाहसंस्था श्वेतकेतूपूर्वीही होती, कारण त्याच्या बापाचा व आओीचा उल्लेख सांपडतो, तो अरवीं सापडला नसता. त्यानें फक्त स्त्रियांच्या व्यभिचारस्वातंत्र्याला बंदी केली. परमेश्वर मानणारे लोक त्याचेविषयीं आचरट विधानें करीत असतात, कारण त्यांना कोणताच पुरावा लागत नाही. विधवा होणें ही परमेश्वराची कृपा असल्यास स्त्रियांनी लग्नच कां करावें? तें न केल्यास त्या आपली कर्तबगारी दाखवण्यास स्वतंत्र राहतील. २. अनौरस मुलांना कमी समजणें हा खरोखरच समाजाचा अन्याय आहे आणि हा अन्याय अमेरिकेंत काढून टाकला आहे. तेथें जन्माची नोंद करतांना फक्त आओीच्या नांवाची नोंद करतात, बापाच्या नांवाची करीत नाहीत, यामुळें 'बाप दाखव' असें म्हणण्यास जागा रहात नाही. सं.

---

# शारदेचें पत्र

डाक्तरांना थोडेंबहुत आधुनिक शास्त्रीय ज्ञान मिळवावें लागतें, कारण तें परीक्षेलाच नेमलेलें असतें, परंतु पुष्कळ वेळां डाक्तरी करणाराची मनोवृत्ति शास्त्रीय म्हणजे बुद्धिवादी नसते. यामुळेंच कित्येक डाक्तर थिऑसॉफीसारख्या फंदांत पडतात, कित्येक फलज्योतिषावर विश्वास ठेवतात, कित्येक फ्रीमेसन होतात (ही अेक जागतिक संस्था आहे, पण तिच्या अिंग्लिश शाखेचा सभासद होण्याकरतां अीश्वरावर विश्वास असावा लागतो). वैद्यकी हें अितर शास्त्रांच्या पंक्तीला बसूं शकत नाही, कारण त्यांत अितर शास्त्रांच्यासारखे सर्वसामान्य नियम नसून रोग्यागणिक वेगवेगळे उपचार करावे लागतात, कारण प्रत्येक

रोग्याचे आनुवंशिक गुणदोष वेगळे असतात आणि ते जमेंत धरावे लागतात. अर्थात् कित्येक डाक्तर बुद्धिवादी देखील असतात, परंतु सामान्यतः डाक्तरांना बुद्धिवादी दृष्टीने कांटेकोर विचार करण्याची संवय होत नाही. ज्योतिष किंवा अितर धार्मिक वेडें डाक्तरांना असतील, तर त्यांपासून रोग्यांना धोकाच असतो आणि अशा डाक्तरांपासून लोकांनी सावध राहणें बरें.

आयुर्वेदाला वेद म्हटल्यामुळें त्याला धार्मिक स्वरूप आलें आहे आणि यामुळें धर्म जसा सनातन असतो, त्याचप्रमाणें चरकाने किंवा वाग्भटाने जे सिद्धांत हजारों वर्षांपूर्वी मांडले, ते खोटे असणें शक्यच नाही, ते अक्षरशः खरे असलेच पाहिजेत, अशी पुष्कळ वैद्यांची समजूत असते. अर्थात् ही समजूत हास्यास्पद आहे हें सिद्ध करणें कठिण नाही. पण वैद्यांची ही समजूत जाणें कठिण आहे.

फलज्योतिषाचा आचरटपणा सर्व जगभर पसरलेला आहे. तो आयुर्वेदालाही बाधतोच. टिळकांच्या शेवटच्या आजारांत काशीच्या त्र्यंबकशास्त्र्यांना तार करून बोलावलें होतें, परंतु त्यांचें उत्तर आलें की टिळक अमुक दिवशीं मरणार आहेत, तेव्हां उपचार करण्यांत अर्थ नाहीं, असें मीं नुकतेंच वाचलें. येथले अेक डाक्तर वैद्यकी आणि ज्योतिष असा दुहेरी धंदा करीत असत, आणि ते अशीच जाहिरात देत असत की रोगी बरा होणार की नाही हें अगोदर ज्योतिषाने ठरवून मगच मी उपचार करतों, म्हणजे तो बरा होण्यासारखा नसल्यास रोग्याचे पैसे फुकट जात नाहीत. अर्थात् तो बरा होअील असेंच ज्योतिषांत नेहमी सापडतें, कारण अेरवीं डाक्तरी कशी चालणार? म्हणजे ही केवळ दुहेरी पैसे उपटण्याची युक्ति होती.

आयुर्वेद, ॲलोपथी, होमिओपॅथी, वगैरे सर्व उपयुक्त आहेत, परंतु त्यांत ज्योतिषासारखें वेड मात्र शिरतां कामा नये. पण हें वेड सर्वत्रच आहे त्याला अिलाज काय? नुकतेंच मी बारा क्षारांच्या पद्धतीवर अेक पुस्तक

पाहिलें, 'त्यांत 'मेडिकल अ‍ॅस्ट्रॉलजी' (वैद्यकीय फलज्योतिष) नांवाचें अेक प्रकरण होतें. त्यांत लेखकानें अेका अिंग्रजी ग्रंथाचा आधार दिला होता, जणूं काय अिंग्रजी आधार असला म्हणजे कोणताही सिद्धांत खरा असलाच पाहिजे! आणि नंतर या विद्वानांनी स्वतः संशोधन करून असा अजब शोध लावला की ऋग्वेदांत व सांख्ययोगांत ज्याला पुरुष म्हटलेलें आहे (पुरुष-सूक्त पहा), त्याचे बारा अवयव म्हणजेच बारा राशि होत आणि सर्व प्राणी म्हणजे त्याच्याच लहान आवृत्त्या आहेत. बरें, बारा राशींचा आणि बारा क्षारांचा संबंध काय, तर शरीराचे हे बारा घटक वेगवेगळ्या राशींत उत्पन्न होतात, उदाहरणार्थ सूर्य मेष राशींत असतांना पृथ्वीवरील सर्व वनस्पतींच्या व प्राण्यांच्या अंगांत 'पोटॅशिअम फॉस्फेट' उत्पन्न होतें, वृषभ राशींत 'सोडिअम सल्फेट' अित्यादि, याला आधार काय? तर राशी बारा आहेत, आणि क्षारही बारा आहेत, तेव्हां या दोहोंचा संबंध कोणालाही जोडतां येतो. ज्योतिषासारख्या विषयांत यापेक्षां जास्त पुरावा काय पाहिजे? अकरावी रास कुंभ ही आहे व कुंभ (म्हणजे मडकें) पाण्याकरतां वापरतात, तेव्हां या राशीचा मिठाशीं ('सोडिअम क्लोराअिड'शीं) संबंध असलाच पाहिजे, कारण शरीरांत पाणी किती आहे हें मिठावर अवलंबून असतें. अेकंदरींत हे सगळे बादरायण संबंध लावून शरीराचा बारा राशींशीं संबंध जोडणें अतिशय सोपें आहे, पण तें कोणाही विचारवंताला पटणारें नाही. ज्याच्या डोक्यांत ज्योतिषाचा आणि वैद्यकीचा गोंधळ झालेला आहे, असा वैद्य किंवा डाक्तर कितपत यशस्वी उपचार करील याची कोणालाही शंकाच येअील. अशा वैद्यांपासून आणि डाक्तरांपासून शहाण्या माणसाने दूरच रहावें हें बरें.

जनतेला फसवण्याचे मार्ग पुष्कळच आहेत, उदाहरणार्थ मंत्रचिकित्सा-लयांचाही धंदा चालतो. मंत्रांचें ढोंगही फार जुनें आहे आणि श्रद्धाळू लोकांना फसवायला आणखी काय लागतें? योगसामर्थ्य हीही फसवणूकच

आहे. साहित्यपत्रिकेच्या चालू अंकांत श्री. द. के. केळकरांनीं ' ज्ञानेश्वराने अितक्या लवकर जीव कां दिला ' ( याची धार्मिक भाषा ' समाधि घेतली ' अशी आहे ), त्याला योगसामर्थ्याने मुसलमानांच्या हल्ल्याला तोंड देतां आलें नसतें का, असा प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांचा योगसामर्थ्यावर खरोखरच विश्वास आहे की काय, याबद्दल त्यांच्या लेखावरून माझी खात्री होत नाही. योगसामर्थ्य ही नुसती कविकल्पना आहे, थाप आहे, असेंच त्यांना कदाचित् हळूच सुचवायचें असेल असें मला वाटतें. आपले योगी समजलेले संत मुसलमानांचा पाडाव करायला असमर्थ ठरले, अितकेंच नव्हे तर त्यांनी कोठे तसा प्रयत्नही केलेला दिसत नाही. मग योगसामर्थ्याच्या गप्पांवर लोक विश्वास कसा ठेवतात ?

पाऊस पडावा म्हणून देवाला प्रार्थना करण्यापासून धमकी देण्यापर्यंत पुष्कळ मार्ग मी अैकले होते, पण परवां जी बातमी वाचली, ती कांही औरच आहे. उत्तर हिंदुस्थानातल्या अेका गांवच्या बऱ्याच बायकांनी पावसाकरतां असा उपाय योजला की त्यांनी नागव्यांनी मोट चालवली, नांगर धरला आणि नाच केला. अितक्यांत पाऊस पडूं लागला, तेव्हां तो या नंग्या नाचामुळेंच पडला अशी साहजिकच त्यांची कल्पना झाली. ही गंमत पहायला अर्थातच पुष्कळ लोक जमले होते आणि त्यांनी म्हणे नागव्या बायकांची पूजा केली. ती मोठ्या पवित्र भावनेने केली असें छापलें आहे, पण त्यांतच अेक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे की पूजा करणें म्हणजे त्यांना अधिक जवळून पाहण्याची अेक युक्ति आहे. बायका नागव्या झाल्यावर लोक पहायला जमतील यांत नवल नाही, पण मागें जेव्हां नाशिकला जैन साधूंची नग्न मिरवणूक अंधारांतून काढायला सरकारने परवानगी दिली होती, तेव्हां लोकांनी तेथें उजेड करून आपली जिज्ञासा तृप्त केली. अर्थात् या साधूंना पहायला बायकाही गेल्या होत्या. अेकंदरींत नग्नतेला लोकांत किती आकर्षण आहे हेंच यावरून दिसतें. नग्नतेबद्दल किळस वाटतो असें ढोंग कांही लोक करतात, पण ते

देखील चोरून पाहतातच. जें कधींच सामान्यतः दिसत नाही, तें पाहण्याची सर्वांनाच प्रबल अिच्छा व्हावी हें साहजिक आहे आणि ती नाकारणें म्हणजे ढोंग आहे.

अितके दिवस फुकटची अैट मारीत असलेल्या मुरारजींनी शेवटीं शर्यतींच्या बाबतींत तरी हार खाल्ली आणि मुंबई सरकार शर्यती बंद करणार नाही असें जाहीर केलें. मग दारूबंदीच्या बाबतींत तरी ते आपला हट्ट कां चालू ठेवतात? शर्यती कां चालू ठेवणार, याला कारण सरकारचें आर्थिक नुकसान होअील अेवढेंच आहे आणि तेंच कारण दारूबंदी-च्याही विरुद्ध आहे. जुगार जरी बंद करणें शक्य नसलें, तरी शर्यती बंद करणें शक्य होतें, कारण शर्यती खाजगी रीतीने करता येत नाहीत. पण दारूबंदी करणें ही अशक्य गोष्ट आहे असें आतां अनुभवा-वरून सिद्ध झालें आहे आणि तसा प्रयत्न करण्यांत अतोनात नुकसान झालेलें आहे, मग केवळ हट्टाने हा प्रयत्न चालू ठेवणें म्हणजे मूर्खपणा आहे हें मुरारजींना कां पटत नाही? त्यांना विचार करण्याची संवय नाही, अेवढेंच त्यावरून सिद्ध होतें. अेक वेळ स्वार्थी मनुष्य पतकरेल, पण मूर्ख मनुष्य अधिकारावर आला म्हणजे लोकांचें जास्त नुकसान होतें. जबरदस्तीने लोकांची नीति सुधारत नाही, हें मूर्खांना कसें कळावें? शिवाय दारू पिणें ही अनीति आहे असें मला वाटत नाही. ती बेतांत प्याल्यास कोणतेंही नुकसान होत नाही असा सर्वांचा अनुभव आहे. अतिरेकाने नुकसान होअी-लच, पण तें फक्त दारूच्याच बाबतींत खरें आहे असें नाही. भोजनांत अतिरेक केल्यानेही नुकसान होअील, म्हणून तें सोडून द्यायचें की काय? पण ज्यांना विचारच करतां येत नाही त्यांना हें सांगून काय उपयोग?

डॉ. जयकर हे अत्यंत बुद्धिमान गृहस्थ आहेत आणि ते मोठमोठ्या जागांवरून निवृत्त झालेले आहेत, तेव्हां त्यांच्या अंगीं थोडीबहुत अरेरावी आली असली तर नवल नाही. पण सर्व विद्यार्थ्यांची गैरसोय होअील अशीच

योजना त्यांनी लोकांवर लादण्याचा प्रयत्न केला, तर त्यांना कोण पाठिंबा देणार? ह्याच प्रकार चालू राहिला तर त्यांना राजीनामा देण्याची वेळ आल्याशिवाय राहणार नाही. त्यांच्याअितकींच लायक अशीं दुसरीं माणसें त्यांची जागा घ्यायला सांपडणार नाहीत असें त्यांना वाटत असेल तर तो त्यांचा भ्रम आहे. रँग्लर परांजपे पुण्यांतच आहेत आणि त्यांनी लखनौ विद्यापीठांत पूर्वीं हेंच काम केलेलें असल्यामुळें त्यांना अनुभवही आहे. त्यांना त्यांच्या जागीं कां नेमूं नये?

तुझी **शारदा**

---

मुलीला मागणी घालण्याकरतां अेक होतकरू तरुण तिच्या बापाला भेटायला गेला असतां पुढील संवाद झाला. 'पण आपली मिळकत काय आहे?' 'दोघांना पुरेशी आहे.' 'पण मुलें झालीं म्हणजे पुरणार नाही!' 'आम्ही मुलें होऊंच देणार नाही.' 'त्यांत कांहीं अर्थ नाही. तें केव्हां केव्हां फसतें.' 'गेल्या पांच वर्षांत तरी कधी फसलें नाही!' (अमेरिकन फ्रीमन).

---

कॅथोलिक पंथाचा सर्वाधिकारी जो पोप, तो रोम शहरांत राहतो आणि तेथें पाऊस न पडल्यामुळें त्याने लोकांना पावसाकरतां प्रार्थना करण्यास सांगितलें. कांही दिवसांनी तेथें अितका पाऊस पडला की पूर येऊन तीनशें कुटुंबांचीं घरें बुडालीं. तें पाहून पोपने अेक तांतडीचें पत्रक काढलें. 'पावसाबद्दल अीश्वराचे लवकर आभार माना, नाहीतर सबंध रोम शहर बुडून जांअील.' अीश्वर दयाळू आहे याचा हा पुरावा काय थोडा झाला?

---

**समाजस्वास्थ्य** मासिक दर १४ तारखेला टपालांत पडतें. वर्गणी रु. ३, व्ही. पी. ने रु. ३-६-०

# आमचेकडे मिळणारा माल

## किंमती कमी केल्या !

**लॅंबट डच कॅप,** रु. ६. **अमेरिकन,** रु. ८. **उभट टोपी,** रु. १॥. **कॉंट्रॅसेप्टॅलीन** ( देशी जेली, मोठी नळी ) रु. ३. **कोरोमेक्स जेली** ( अमेरिकन, मोठी नळी) रु. ५. **पिशव्या,** ४ आणे, ८ आणे, १० आणे, रु. १।. **भोंवऱ्याची पिचकारी,** रु. ७. **राअिटयूब** ( रोगप्रतिबंधक ), रु. १-२-०, डझनास रु. १३.

**राइट एजन्सी,** १३ भटवाडी क्रॉस लेन, मुंबई ४.

**पॅरिसच्या परी,** दुसरी आवृत्ति विक्रीस तयार, रु. ३. **या पुस्तकाची जाहिरात केसरीने नाकारली आहे.**

**प्रो. ना. सी. फडके** यांचीं पुस्तकें :—

**प्रतिभासाधन,** रु. ५. **महात्मा गांधी,** रु. १॥. **किशोर-कथा,** रु. १॥. **भरतीची लाट** ( कादंबरी ), रु. ४. **माझ्या साहित्यसेवेंतील स्मृति** भाग २ रा, रु. ३. **शाकुंतल** ( जप्त झालेली कादंबरी ) रु ४.

**राअिट अेजन्सी,** १३ भटवाडी क्रॉस लेन, मुंबई ४.

Registered No. B 2289.


## प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत इतर पुस्तकें

१. क्रैब्याची मीमांसा, किंमत रु. ६, ट. ख. ८ आणे
२. आधुनिक आहारशास्त्र, किं. १॥ रु, ट. ख ८ आणे
३. आधुनिक कामशास्त्र [ सचित्र ], ५ वी आवृत्ति
किंमत रु. ४, ट. ख. ८ आणे.
४. संततिनियमन [सचित्र], १० वी आ. १। रु. ट. ख. ७ आ.
५. गुप्त रोगांपासून बचाव, ४ थी आ. रु. १, ट. ख. ७ आणे.
६. 'समाजस्वास्थ्य' मासिकांतील निवडक लेख,
भाग २ रा [ वर्षें ४-५-६ ], किं. २-०-०, ट. ख. ८ आ.
७. त्वचेची निगा, किं. ८ आ., ट. ख. ७ आ.
८. गुरुबाजी ( नाटक ), किं. ८ आ., ट. ख. ७ आणे
९. वेश्याव्यवसाय, किं. २ रु., ट. ख. ८ आ.
१०. तेरा गोष्टी, किं. १ रु. ट. ख. ७ आ.
११. न्यायाचा शोध (नाटक), किं १ रु., ट. ख. ७ आ.
१२. पॅरिसच्या परी (दुसरी आवृत्ति) रु. ३., ट. ख. ८ आणे

### डॉ. के. भा. लेलेकृत

१. बाहेरख्यालीचे दुष्परिणाम, २ री आ., किं. ५ आ.
२. मूळव्याध, किं. ४ आ.

### श्री. शकुंतला परांजपेकृत

Three years in Australia, Rs. 3/15. Postage As. 8

राइट एजन्सी, नं. १३, भटवाडी क्रॉस लेन, मुंबई नं. ४.


मुद्रण स्थळः—पॉप्युलर प्रेस, (मुंबई) लिमिटेड, ३५, ताडदेव रोड, मुंबई–७

मुद्रक व प्रकाशकः—रघुनाथ धोंडो कर्वे, राइट एजन्सी,
नं. १३, भटवाडी क्रॉस लेन, गिरगांव, मुंबई–४